**नि.फौ.के. नं. ५०/२०१७**
**महाराष्ट्र शासन वि.आनंद वेर्गुलेकर**
**निशाण क्र. ४७**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – सुरेश सिताराम शिरगावकर,

**वय –** ६२ वर्षे, **व्यवसाय** – चप्पल व बॅग विक्री व्यवसाय,

**राहणार –** नावडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक २१/१०/२०१६ रोजी पोलीस माझ्याकडे चौकशीसाठी आले होते. पोलीसांनी मला त्यावेळी सांगितले की, ''सोमा कानसे यांनी वेंगुर्लेकर यांना पैसे दिले होते''. पोलीसांनी माझ्याकडे बाकी काही चौकशी केली नाही.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०२**. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २१/१०/२०१६ रोजी पोलीसांनी ''विनायक शिवाजी कानसे, राहणार – कळबंस्ते यांनी अनंत यशवंत वेंगुर्लेकर याच्याविरुध्द त्याने महसूल खात्यात शिपाई पदावर नोकरी लावून देतो असे सांगून वेळोवेळी रोख व बँकेमार्फत एकूण रक्कम रुपये १५,६७,२००/– घेवुन नोकरीस न लावता घेतलेली रक्कम परत न देता फसवणूक केल्याची तक्रारी दिली आहे'', असे मला सांगितले.

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, विनायक कानसे व सोमा कानसे हे दोघेही माझ्या परीचयाचे असून ते माझ्या दुकानात नेहमी यायचे. हे म्हणणे खरे नाही की, सोमा कानसे हे शेती व लाकूड कामाचा व्यवसाय करीत असल्याने आम्ही दोघे एकमेकांना मदत करीत असायचो. हे म्हणणे खरे आहे की, ऑक्टोबर – २०१४ मध्ये विनायक कानसे

याच्यासोबत त्याचा मित्र आला होता व त्याचे नाव आनंद यशवंत वेंगुर्लेकर, राहणार – कुवारबांव असे मला त्यावेळी समजले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी विनायक याने आनंद वेंगुर्लेकर यांना आंबा बागायत फवारणीसाठी पैशांची आवश्यकता आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्या दुकानात सोमा कानसे आल्यानंतर मी त्यांना आनंद वेंगुर्लेकर यांना आंबा बागायत फवारणीसाठी पैशांची आवश्यकता असल्याचे सांगितले होते. त्यापुढे काय व्यवहार झाला हे मला माहित नाही. आनंद वेंगुर्लेकर यांना ओळखतो. आज रोजी ते न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एम. जाधव यांचेकडून –**

०४. हे म्हणणे खरे आहे की, आनंद वेंगुर्लेकर व सोमा कानसे यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत मला पोलीसांकडून कळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर व्यवहाराबाबत मला वैयक्तिरीत्या काहीही माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.31 10:51:46 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दिनांक ३०.०७.२०२५ — न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 30/07/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 30/07/2025 |
| Evidence uploaded on | :- | 31/07/2025 |